धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय
३ रा मजला, ८३, डॉ.ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई- ४०००१८.
दिनांक : २५.०५.२०१६

कार्यालयीन परिपत्रक क्र. ४६३ दिनांक : २५.०५.२०१६

## परिपत्रक

मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या निदर्शनास आले आहे की, धर्मादाय संघटनेतील विभागीय कार्यालयातील गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचारी हे कार्यालयीन कामाच्या वेळेत त्यांचे स्वत:चे कामकाज सोडून मुख्यालय, मुंबई येथे बदलीसाठी विनंती अर्ज घेऊन अधिकारी व कर्मचाऱ्यांशी वैयक्तिक भेट घेतात. यामुळे मुख्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या कार्यालयीन कामकाजावर परिणाम होत आहे. कर्मचाऱ्यांचा असा समज आहे की मुख्यालयात अधिकारी वर्गाला येऊन भेटल्याने बदलीबाबतची विनंती मान्य होते. प्रत्यक्षात कुठलीही बदली प्रशासनाच्या सोयीला प्राधान्य देऊन करण्यात येत असते व कर्मचाऱ्यांनी पाठविलेल्या लेखी विनंती अर्जाच्या अनुषंगाने विचार करुन बदल्या करण्यात आल्या आहेत.

तरी या परिपत्रकाद्वारे विभागीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, कर्मचाऱ्याने बदलीसंदर्भात मुख्यालयात येऊ नये व त्याबाबत लेखी निवेदन संबंधित कार्यालय प्रमुखामार्फत पाठविण्यात यावे.

(श.भा.सावळे),
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. सर्व धर्मादाय सह आयुक्त / धर्मादाय उप आयुक्त / सहायक धर्मादाय आयुक्त
२. विभागीय कार्यालयातील कर्मचारीवृंद (संबंधित कार्यालय प्रमुखांमार्फत)
३. निवड नस्ती